महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र. १४४२(२)(२)/२०१९/तेवीस दिनांक : २५ मार्च, २०२२.

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट - ब मुख्य परीक्षा- २०१९
पोलीस उपनिरीक्षक संवर्गाचा अंतिम निकाल
जाहिरात क्रमांक ०१/२०१९ व अधिसूचना क्र.०८/२०१९

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २८ जुलै, २०१९ (पेपर क्र.१) व दिनांक ४ ऑगस्ट, २०१९ (पेपर क्र.२) रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट - ब मुख्य परीक्षा - २०१९ मधील पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या एकूण ४९६ पदांपैकी ४९४ पदांचा अंतिम निकाल दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. सदर परीक्षेमध्ये पुणे जिल्हयातील **श्री. बर्वे निलेश विलास, बैठक क्रमांक PN004379** हे राज्यातून **प्रथम** आले आहेत व अहमदनगर जिल्हयातील **श्री. सैद विजय रंगनाथ, बैठक क्रमांक PN001026** हे मागासवर्गवारीतून **प्रथम** आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून कोल्हापूर जिल्हयातील **श्रीमती रावण सुप्रिया मारुती, बैठक क्रमांक PN008077** ह्या राज्यात **प्रथम** आल्या आहेत.

३. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरीता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (cut off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

४. प्रस्तुत मुख्य परीक्षा दिनांक २८ जुलै, २०१९ (पेपर क्र.१) व दिनांक ४ ऑगस्ट, २०१९ (पेपर क्र.२) रोजी मुंबई, औरंगाबाद, पुणे व नागपूर या जिल्हा केंद्रांवर घेण्यात आली. लेखी परिक्षेच्या निकालाच्या आधारे शारीरिक चाचणी व मुलाखतीसाठी २०८७ उमेदवार अर्हताप्राप्त ठरले. शारिरीक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ ते २३ फेब्रुवारी, २०२२ या कालावधीत घेण्यात आला आहे.

५. प्रस्तुत निकालाधारे शिफारसपात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहेत. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास, शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

६. अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडू आरक्षणासाठी दावा केलेल्या उमेदवारांसंदर्भात शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, शासन शुध्दीपत्रक, क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शासन शुध्दीपत्रक, क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ११ मार्च, २०१९ तसेच शासन शुध्दीपत्रक, क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक २४ ऑक्टोबर, २०१९ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार **विषयांकित अराजपत्रित गट-ब पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकाचे म्हणजेच दि. २९ जानेवारी, २०१९ रोजीचे किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र तसेच पूर्व परीक्षेचा अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांचेकडे प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर करणे व त्यांसदर्भातील उक्त दिनांकाची किंवा तत्पूर्वीची पोचपावती शासनास सादर करणे बंधनकारक आहे. तसेच खेळाडू उमेदवारांनी त्यांच्या क्रीडाविषयक प्रमाणपत्राचा संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी प्रमाणित केलेला क्रीडा प्रमाणपत्र पात्रतेचा अहवाल शासनास सादर करणे अनिवार्य राहील.**

७. प्रस्तुत परीक्षेच्या अंतिम निकालात एकूण ४९६ उमेदवारांपैकी अनाथांसाठी आरक्षित असलेली २ पदे प्रशासकीय कारणास्तव रिक्त ठेवण्यात आली आहेत.

८. प्रस्तुत परीक्षेचा निकाल मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायिक प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

९. प्रस्तुत अंतिम निकालातील ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मधील सूचना क्रमांक ६.४.४ पहावे)

दिनांक : २५ मार्च, २०२२ उपसचिव (परिक्षोत्तर) (अ.प.)
ठिकाण : मुंबई महाराष्ट्र लोकसेवा आयोग